नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०९/२०२६ (मंगळवार)

....................................................................................................

## नागपूर ग्रामीणमध्ये डि.जे. व लेझर लाईट मुक्त गणेश विसर्जन; शांतता, शिस्त आणि उत्साहात ५५६ गणेशमूर्तींचे विसर्जन

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्ह्यात यावर्षी एकूण ५५६ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन डि.जे. व लेझर लाईट मुक्त वातावरणात शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच ध्वनिप्रदूषणास आळा घालण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. नागरिक, गणेश मंडळे तसेच डिजे चालकांना ध्वनिप्रदूषणाबाबत आवश्यक सूचना देऊन पर्यावरणपूरक व शांततामय पद्धतीने गणेश विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मा .श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली संपुर्ण गणेशोत्सव तसेच गणेश विसर्जन काळात ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्यावर मोठ्या आवाजाचा विपरीत परिणाम होऊ नये, सार्वजनिक शांतता भंग होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनीप्रदूषणाबाबत आवश्यक आदेश निर्गमित करण्यात आले होते तसेच कलम ३६(ई) (ई—ए) व कलम ३८(१) महराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये अधिसुचना जारी करण्यात आली होती. सदर आदेशानुसार, परवानगी मिळाल्यानंतरही संबंधित आयोजकांना **Noise Pollution (Regulation and Control) Rules** २००० मध्ये निर्धारित करण्यात आलेल्या ध्वनी मर्यादेचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच ध्वनिप्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने संबंधितांना लेखी आदेश व

सूचना देण्यात आल्या होत्या. विसर्जन मिरवणुकीदरम्यान डिजे चा वापर न करण्याबाबत गणेश मंडळांना तसेच डिजे चालकांना स्पष्टपणे सूचना देण्यात आल्या होत्या.

नागपुर ग्रामीण जिल्हयात गणेशोत्सवाच्या कालावधीत गणेश मंडळांचे पदाधिकारी, आयोजक तसेच डिजे चालक यांच्याशी समन्वय साधण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने गणेश मंडळांचे पदाधिकारी, आयोजक यांच्या उपविभाग स्तरावर ६ बैठका घेतल्या तसेच पोलीस स्टेशन स्तारावर २४ बैठका आणि डिजे चालक यांच्या पोलीस स्टेशन स्तरावर २४ बैठका अशा एकूण ५४ बैठका घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियम, न्यायालयीन निर्देश तसेच विसर्जन मिरवणुकीदरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस विभागाने केलेल्या पूर्वनियोजनाचा तसेच गणेश मंडळे, आयोजक आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. नागपूर ग्रामीण जिल्ह्यात गणेश विसर्जनाच्या वेळी कोठेही डिजे चा वापर करण्यात आला नाही. तसेच लेझर लाईटचा सुध्दा वापरही करण्यात आला नाही. त्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुका शांततामय वातावरणात पार पडल्या.

गणेशोत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून संवेदनशील ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी विसर्जन मार्ग, गर्दीची ठिकाणे तसेच विसर्जन स्थळांवर प्रत्यक्ष उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले.नागरिकांनी तसेच गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डिजे आणि लेझर लाईट मुक्त, शांततामय आणि शिस्तबद्ध गणेश विसर्जनात सहकार्य केले.










झेरॉक्स
लॅमिनेशन




ज्वेलर्स
॥श्री शिव साम्राज्य॥



# मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक"
# (All Hands Meet)

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली.** उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. **सदर बैठकीदरम्यान विविध शाखांच्या कामकाजाचा आढावा घेताना कामकाज अधिक गतिमान व कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्यात आले. याशिवाय विविध शाखा व कार्यालयांच्या कामकाजानुसार आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबत चर्चा करून मनुष्यबळ वाढ करण्याचे आदेश करण्यात आले. तसेच मागील बैठकीत मांडण्यात आलेल्या अडचणींबाबत मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी संबंधितांकडून माहिती घेऊन, सदर अडचणींचे निराकरण झाले आहे किंवा कसे, याबाबत आढावा घेतला. यावेळी मागील बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व अडचणींचे निराकरण करण्यात आले असून, संबंधित मागण्यांचीही पूर्तता झाल्याचे निदर्शनास आले. मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी अधिकारी व अंमलदारांच्या सूचना गांभीर्याने ऐकून घेत, पोलिस दलाच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी दूर करून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर, कार्यक्षमता वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले.**

सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली. **सदर सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधिक्षक (गृह),तसेच सर्व शाखेचे**

प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.





## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीवर कारवाई करून एकुण २७ लाख ९५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २८/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वर सिहोरा फाटयाजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बारा चक्का ट्रक क्र. एम एच—३४/ए बी— ९३५८ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २५ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बारा चक्का ट्रक क्र. एम एच—३४/ए बी— ९३५८ किंमती २५,००,०००/— रूपये आणि २५ गोवंश जनावरे किंमती २,९५,०००/— रूपये असा एकुण किंमती २७,९५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी ट्रक क्र. एम एच—३४/ए बी— ९३५८ चा चालक व मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ११(१), (अ), (ड), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (१), (२), ९ महा. पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम ३२५, ४९, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**




## शेताच्या कुंपणाला विद्युत करंट लावून इसमाच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या आरोपीविरूद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक २८/०९/२०२६ रोजी बोरी पोलीस स्टेशन येथे फिर्यादी रमेश झोकम सलाम वय ४५ वर्ष, रा. बटवानी, जि. शिवनी, ह. मू ओझन इंफ्रा टेक्वर ले आउट, मोहगाव, ता. जि. नागपूर यांनी फिर्याद दिली की, दिनांक २८/०९/२०२६ रोजी मौजा मोहगाव शिवार येथे फिर्यादीसोबत मृतक नामे दयावंत बिरसिंग सैयाम, वय ३० वर्ष, रा. बटवानी, जि. शिवनी, ह. मू. ओझन इंफ्रा टेक्वर ले आउट मोहगाव, ता. जि. नागपूर हा आरोपीच्या शेतामध्ये जळाउ लाकडे आणण्याकरीता गेला असता, आरोपीने शेताच्या कुंपणाला विद्युत करंट जोडून ठेवला होता. सदर विद्युत करंटच्या

संपर्कात आल्याने मृतकास विजेचा जोरदार धक्का बसून त्याचा मृत्यू झाला. आरोपी प्रभाकर शामराव गिरडे, वय ५५ वर्ष, रा. शिरूड, ता. जि. नागपूर याला शेताच्या कुंपणाला विद्युत करंट जोडुन ठेवल्याने मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या शेताच्या कुंपणाला विद्युत करंट जोडून ठेवल्याने मृतकास विजेचा जोरदार धक्का बसून त्याचा मृत्यूस आरोपी कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बोरी येथे **आरोपी प्रभाकर शामराव गिरडे, वय ५५ वर्ष, रा. शिरूड, ता. जि. नागपूर** विरूद्ध कलम १०५ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी १) विठोबा बापुराव डंभाळे, वय ५८ वर्ष, रा. चारगाव, ता. काटोल २) अर्जुन विलास सनेसर, वय २८ वर्ष, रा. काटोल, ता.काटोल हे तारबाजार काटोल येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे नरखेड अंतर्गत** आरोपी **ग**णेश शेषराव वाडोदे, वय ३० वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड हा मौजा मोवाड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे कळमेश्वर अंतर्गत** आरोपी धिरज शंकर धुर्वे, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ धापेवाडा हा मौजा बस स्टॉप जवळ कळमेश्वर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १० गुन्हे दाखल,

**दिनांक २८/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) संदिप उर्फ लखण केशवराव उईके, वय ३५ वर्ष, रा. खरसोली २) जुगल वसंतरावजी बोरकर, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. २, मोवाड, तह. नरखेड ३) रज्जु उर्फ राजु करोडीलाल उईके, वय ३५ वर्ष, रा. अंबाडा देशमुख, तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी रीतीक राजकुमार मडावी, वय २७ वर्ष, रा. वडंबा, ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** आरोपी ०१) मोरेश्वर गुलाब मोहणकर, वय ४६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, नगरधन ता.रामटेक, जि. नागपूर ०२) रामदास सोनेलाल कोकोडे, वय ५५ वर्ष, ०३) विष्णु मारोतराव कंगाले, वय ४५ वर्ष, ०४) सुधाकर ग्यानीलाल परतेती, वय ४६ वर्ष, तिन्ही रा. संग्राम फुलझरी, ता. रामटेक, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी फजित भाकरूजी केळवदे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, आमडी, ता. रामटेक, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत महिला आरोपी** हिचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** आरोपी नामे वासुदेव रामाजी मरस्कोल्हे, वय ७० वर्ष, रा. डोरली (भिंगारे), ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** आरोपी नामे १) प्रमोद शामराव गिरगुसे, वय ३२ वर्ष, रा. गांधी शाळेच्या मागे नवीन वस्ती, खापा २) दिपक सुखदास कोल्हे, वय ४० वर्ष, रा. गांधी शाळेच्या मागे नवीन वस्ती, खापा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १६२० मिली देशी दारू, २४९ लिटर मोहाफुल दारू, १६०० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण १,१८,५००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६८६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण .. रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २२ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






पोलीस





जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण),